**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**नागरी पथविक्रेत्यांच्या अधिकारांचे रक्षण करणे आणि**
**पथविक्रेत्यांच्या कृत्यांचे नियमन २०१४ च्या अनुषंगाने**
**शहर फेरीवाला समिती सदस्य नियुक्तीबाबत**
**मुदत वाढ जाहीर प्रकटन**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील फेरीवाल्यांच्या संदर्भात राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९ लागू करण्याच्या दृष्टिने आवश्यक ती कार्यवाही/उपाययोजना करणेबाबत महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांनी पारीत केलल्या शासन निर्णय क्र.राफेधो-२०१३/प्र.क्र.३९/नवि-३४ दि. २१ ऑक्टोंबर २०१३ चे आदेशान्वये तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या दि.०३/११/२०१७ रोजी दिलेल्या आदेशान्वये "नगर पथविक्रेता समिती" गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

खालील नमुद प्रवर्गातील सदस्य नियुक्तीकरीता इच्छुक प्रतिनिधी कडुन अर्ज मागविण्यांत येत आहेत.

| अ.क्र. | प्रवर्ग | तपशील | पद | एकुण संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २ | मिरा भाईंदर शहरातील विविध फेरीवाला संघटनाच्या प्रतिनिधींची शहर फेरीवाला समितीच्या एकुण सदस्य संख्येपैकी किमान ४०% म्हणजेच १२ इतके प्रतिनिधी (प्रति संघटना १ सदस्य) | सदस्य | ०७ |
| २ | ४ | मिरा भाईंदर शहरातील विविध इतर नागरी (सिव्हिल) संस्था/संघटना, जशा व्यावसायिक समुहातील प्रतिनिधी जसे वकील, डॉक्टर, नगररचनाकार, आर्किटेक्ट इ. व्यापार व वाणिज्य समुहाचे प्रतिनिधी, शेडयुल्ड बँकेचे प्रतिनिधी अथवा महत्वाचे नागरिक इत्यादींचे प्रतिनिधीमधून शहर फेरीवाला समितीच्या एकुण सदस्य संख्येपैकी किमान २०% म्हणजेच ६ इतके प्रतिनिधी | सदस्य | ०४ |

वरील संघटना/संघ यांची नियुक्ती खालील निकषाच्या आधारावर सर्व सदस्यांचे नामनिर्देशन अर्ज स्विकारण्यात येतील.

१) संघटनेची किंवा संघाची सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केलेल्याचे पाच वर्षापुर्वीचे प्रमाणपत्र
२) संघटना किंवा संघ मागील पाच वर्षाचे (सन २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५, २०१५-१६, २०१६-१७) सक्षम प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेले लेखापरिक्षा अहवाल सादर करील.
३) संघटना किंवा संघ यांना, त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केल्याच्या त्यांच्या प्रवर्गामधील कामाचा किमान पाच वर्षाचा अनुभव असावा.
४) संघटना किंवा संघ त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये सिध्ददोषी असणार नाहीत.
५) संघटनेस किंवा संघास स्थानिक प्राधिकरणाने काळया यादीत टाकलेले नसावे.

तरी वर नमुद केलेल्या मिरा भाईंदर शहरातील अशा संघ/संघटना यांचे प्रतिनिधी यांना "नगरपथ विक्रेता समितीवर" वरील नमुद निकषप्रमाणे सदस्य म्हणुन नियुक्ती करावयाची आहे. त्याकरीता विहीत **नमुन्यातील अर्ज व शासननिर्णय** www.mbmc.gov.in **या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वेबसाईटवर उपलब्ध होईल.** आपला अर्ज विहित नमुन्यात समाजविकास अधिकारी, समाजविकास विभाग, पहिला मजला, मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) येथे नमुद निकषाप्रमाणे कागदपत्रांसह दि.२६/१२/२०१७ दु.०४.०० वाजेपर्यंत जमा करणेत यावेत.

**टिप :- कोणतेही कारण न देता अर्ज स्विकारणे अथवा नाकारणे याचा सर्व अधिकार मा. आयुक्त यांना राहतील.**

(डॉ. संभाजी पानपट्टे)
उप-आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

G:\Jahir Prakatan - Rashtriya Ferivala Dhoran 2009-cod.scr--.docx